महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ ३६७१

दिनांक: २१.०४.२०२३

## सूचना

**विषय :-**"सहाय्यक अभियंता" व "कनिष्ठ अभियंता" या पदांच्या ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेशपत्राची लिंक व माहितीपत्रक.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.१०/२०२२
२) महानिर्मिती सूचना क्र.१२३१ दि.०३.०२.२०२२
३) महानिर्मिती अधिसूचना क्र.३५६३ दि.१९.०४.२०२३

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.१०/२०२२ अन्वये "सहाय्यक अभियंता" व "कनिष्ठ अभियंता" यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीताची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

वरील नमूद पदांकरीता लागू असणारा अभ्यासक्रम महानिर्मिती सूचना क्र.१२३१ दि.०३.०२.२०२२ अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच संदर्भिय क्र.०३ वरील सूचनेनुसार वरील पदांची ऑनलाईन परीक्षा दि.२६,२७ व २८.०४.२०२३ रोजी घेण्यात येणार असल्यावाबत देखील कळविण्यात आले आहे. तरी, उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेकरीताच्या प्रवेशपत्राची लिंक** ↵

तसेच उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक** ↵

१) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीची कागदपत्रांची पडताळणी अथवा तपासणी न करता उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत बसण्याकरीता बोलविले आहे. तथापि, ऑनलाईन अर्जात नमूद केलेली माहिती व जाहिरातीत नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून त्यासंबंधीची कागदपत्रे /प्रमाणपत्रे भविष्यात कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रिये दरम्यान सादर करणे तसेच सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णत: उमेदवाराची राहील. तसेच अर्जात नमूद माहिती उमेदवार सिध्द न करु शकल्यास अथवा खोटी आढळल्यास, भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) वरील ऑनलाईन परीक्षेत उमेदवाराच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

२१/४

कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

C:\Users\madhuri.Vengurlekar\Desktop\Notification AE-JE Exam Hall ticket doc